श्री.धनाजी शिंदे सह संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा यांची मुख्य लेखाधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन आदेश क्रमांक : प्रतिनि-२०२६/प्र.क्र.९६/गृनिभू
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २८ सप्टेंबर, २०२६

संदर्भ:- १. शासन निर्णय सामान्य प्रसासन विभाग क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्या-१२, दि.१७.१२.२०१६.
२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या-१२. दि.१६.१२.२०१८.
३. वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ०८/कोषाप्रशा-२ दिनांक २३.०९.२०२६

शासन आदेश :-

श्री.धनाजी शिंदे, सह संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा यांची महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत मुख्य लेखाधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या पदावर या आदेशाच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. श्री.धनाजी शिंदे, यांची मुख्य लेखाधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली असल्याने, श्री.मो.जे.रॉड्रिक्स, उप संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा यांची मुख्य लेखाधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या पदावरील प्रतिनियुक्ती या आदेशान्वये संपुष्टात आणण्यात येत आहे. त्यांच्या सेवा या आदेशाच्या दिनांकापासून त्यांच्या मुळ विभागास (वित्त विभाग) प्रत्यावर्तित करण्यात येत आहेत.

३. श्री. धनाजी शिंदे यांची मुख्य लेखाधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाचे संदर्भ क्र.१ व २ येथील शासन निर्णय तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे) नियम, १९८१ च्या नियम ४०, परिशिष्ट २ मध्ये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

28/9/26

संचालनालय लेखा व कोषागार
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
29 SEP 2026
प्राप्त झाले सही........................

४. सदर आदेशाच्या अनुषंगाने, श्री.धनाजी शिंदे, सह संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा यांनी मुख्य लेखाधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या पदावर तात्काळ रुजू व्हावे.

५. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी श्री.धनाजी शिंदे, सह संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा यांना मुख्य लेखाधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या पदावर तात्काळ रूजू करून घ्यावे व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९२८१८५४२८८००९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2026.09.28 18:55:17 +05'30'

**(विद्या हम्पय्या)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
५. सचिव, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
६. श्री.धनाजी शिंदे, सह संचालक महाराष्ट्र वित्त व लेखा,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. श्री.मो.जे.रॉड्रिक्स, मुख्य लेखाधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई (सचिव, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई यांच्यामार्फत)
८. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. सह सचिव, गृहनिर्माण विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (गृनिभू), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.